# प्रसिध्दीपत्रक

महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या राजपत्रित अधिकारी व अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी हिंदी भाषा निम्नश्रेणी व उच्चश्रेणी परीक्षा रविवार,दि.२४ डिसेंबर, २०२३ रोजी मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद या चार विभागीय ठिकाणी आयोजित करण्यात येणार आहे. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील आवेदनपत्रे विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांच्यामार्फत खाली नमूद केलेल्या संबंधित विभागीय कार्यालयांकडे दिनांक १३ नोव्हेंबर, २०२३ पर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठविणे आवश्यक आहे.

**मुंबई व कोकण विभाग**
विभागीय सहायक भाषा संचालक,
भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,
कोकण विभाग, कोकण भवन, ३ रा मजला,
नवी मुंबई - ४०० ६१४.
दूरध्वनी क्रमांक ०२२-२७५७३५४२.

**पुणे व नाशिक विभाग**
विभागीय सहायक भाषा संचालक,
भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,
नवीन मध्यवर्ती इमारत,२ रा मजला,
पुणे - ४११ ००१.
दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२१७०९.

**नागपूर व अमरावती विभाग**
विभागीय सहायक भाषा संचालक,
भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,
प्रशासकीय इमारत, २ रा मजला, सिव्हिल लाईन्स,
नागपूर - ४४० ००१.
दूरध्वनी क्रमांक ०७१२-२५६४९५६.

**औरंगाबाद विभाग**
विभागीय सहायक भाषा संचालक,
भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,
औरंगाबाद विभाग, जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर,
औरंगाबाद - ४३१ ००१.
दूरध्वनी क्रमांक ०२४०-२३६१३७२.

अराजपत्रित कर्मचारी व राजपत्रित अधिकाऱ्यांची माहे डिसेंबर २०२३ मधील हिंदी भाषा निम्नश्रेणी परीक्षा (प्रश्नपत्रिका क्र. १) ही महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाच्या सुधारित अभ्यासक्रमाचे इयत्ता १० वी साठी निश्चित केलेले "लोकभारती (द्वितीय भाषा)" या पुस्तकावर आधारित घेण्यात येईल. तसेच हिंदी भाषा उच्चश्रेणी परीक्षा (प्रश्नपत्रिका क्र. १) ही महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाचे इयत्ता १० वी साठी मार्च-एप्रिल, २०१८ मध्ये निश्चित केलेले "कुमारभारती (प्रथम भाषा) " या पुस्तकावर आधारित घेण्यात येईल. प्रश्नपत्रिका क्र. २ च्या अभ्यासक्रमात कोणताही बदल नाही.

परीक्षेस प्रवेश मिळण्यासाठी उमेदवाराने आवेदनपत्र परिपूर्ण भरून मूळ चलनासह संबंधित कार्यालयाकडे विहित मुदतीत पाठविणे आवश्यक आहे. भाषा संचालनालयाच्या परीक्षेसंबंधीची व परीक्षा शुल्कासंबंधीची सर्व माहिती **directorate.marathi.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे.

**भाषा संचालक**
**महाराष्ट्र राज्य,**

**मुंबई**

e:\का. १७ परीक्षा\३ हिंभाप\२०२३\डिसेंबर २०२३\प्रसिध्दिपत्रक.docx